**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २६७/२०००</u>**
**<u>निशाणी क्र. १५६/क सोबत</u>**

नांव -- श्री. हिंदुराव रंगराव जाधव

**<u>शपथेवर साक्षीदार यांचा उलटतपास वादी तर्फे विधिज्ञ श्री. एम एन बिंदगे यांच्या मार्फत,</u>**

०१. मालकी हक्काचा वाद असल्याबाबतचा निष्कर्ष मंत्रालयातील महसूल निकालपत्रात नमूद केला आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही ते निकालपत्र मला मान्य असल्यामुळे मी त्याला आव्हान केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला अडचण होते म्हणून मालकी हक्काचा वाद असल्याने नमूद केलेले मी सांगत नाही.

२. गट नंबर ७१७ चे ३ हेक्टर १० आर इतके क्षेत्र आम्ही खरेदी केलेले आहे. सदर मिळकत चेअरमन, वारणा फुड प्रॉडक्टस अमृतनगर यांच्या कडून खरेदी केलेली आहे. त्यांनी सदर मिळकत तुका चांगो मांग यांच्या कडून खरेदी केली होती. तुका चांगो माग यांचे खरेदीपत्र मी पाहिलेले नाही. आम्ही तुका चांगो मांग यांचे खरेदी पत्र ताब्यात घेण्याचे कारण नाही. तुका चांगो मांग याचे खरेदी पत्र पाहिले नसल्यामुळे त्याबाबत मला काही सांगता येणार नाही. आम्ही खरेदी करण्यापूर्वी जाहीर नोटीस दिलेली नव्हती आम्ही मिळकत खरेदी करण्यापूर्वी त्याचे पूर्वीचे सर्व्हे नंबर काय होते याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीचे पूर्वीचे सर्व्हे नंबर सात बारे उतारे व नकाशा पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग यांनी सन १९९१ मध्ये मिळकत वारणा फुड प्रॉडक्टसला विकली. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग याच्या नावे फक्त ६ एकर ६ गुंठे

इतकी मिळकत होती व तेवढयाच मिळकतीचा मालक होता. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग याच्या नावे १ एकर २० गुंठे मिळकत जास्तीची लागली होती. एकत्रीकरणामध्ये १ एकर २० गुंठे क्षेत्र जास्तीचे लागल्याचे तुका चांगो मांग याला माहीत होते किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. वारणा फुड प्रॉडक्ट्सने मिळकत खरेदी घेताना मोजणी करून मिळकत ताब्यात घेतली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. मी मिळकत खरेदी केल्यानंतर किंवा करताना सर्व्हे कार्यालयाकडून मोजणी करून घेतली नाही साक्षीदार स्वत हून सांगतो की, खाजगी मोजणी करून घेतली. त्याबाबत माझ्याकडे कागद नाही. अरूण धोंडी जाधव यांच्या कडून खाजगी मोजणी सन १९९१ मध्ये करून घेतली. मी खात्री करून घेण्याकरिता मोजणी करून घेतली. खाजगी मोजणीने आमचे समाधान झाल्याने आम्ही सर्व्हे कार्यालयाकडून मोजणी करून घेतली नाही. अरूण धोंडी जाधव हे आमच्या घरा शेजारचे होते. तो ब-याच ठिकाणी मोजणी करत होता. तो सर्व्हे खात्यात नोकरीला नव्हता. त्याने मोजणीचा कोणताही कोर्स केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अरूण जाधव यांच्या कडून खाजगी मोजणी करून घेतल्याचे मी खोटे सांगत आहे.

३. सर्व्हे नंबर २७८ चे दोन गट झाले त्यापैकी गट नंबर ७१७ हा २७८ ब चा झाला व गट नंबर ७१८ हा २७८, १ ब/२अ/१अ२ चा झाला. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ७१७ चे प्रत्यक्षात क्षेत्र २ हेक्टर ४९ आर इतके होते परंतु प्रत्यक्षात ७/१२ सदरी ३ हेक्टर १० आर इतके लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ७१८ चे प्रत्यक्ष क्षेत्र ६ हेक्टर १२ आर इतके असून ७/१२ पत्रकी ५ हेक्टर ५१ आर इतके आहे. सि स नंबर २७८/१ चे क्षेत्र १७ एकर ३८ गुंठे हे राउ उर्फ गणपती शिवराम जाधव यांच्या नावे होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. राउ हे वादीचे चुलते आहेत. राऊ व वादीचे वडील हे एकत्र राहात होते

किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. राउचा व वादीच्या वडिलांचा निम्मा निम्मा हिस्सा होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. त्याप्रमाणे ७/१२ सदरी नावाची नोंद झाली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

४. सर्व्हे नंबर २७८/२ चे क्षेत्र १२ एकर १३ गुंठे होते किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. सदर क्षेत्र तुकाराम गोविंद गाणबावले व तुका चांगो मांग यांच्या नावे होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सर्व्हे नंबर २७८/२ चे स्वतंत्र सात बारे होउन २७८/२ व २७८/३ असे झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सर्व्हे नंबर २७८/२ च्या ७/१२ सदरी ६ एकर ७ गुंठे क्षेत्र तुकाराम गोविंद गाणबावले याच्या नावे झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सर्व्हे नंबर २७८/३ च्या ७/१२ सदरी ६ एकर ६ गुंठे क्षेत्र तुका चांगो मांग याच्या नावे झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग याला ६ एकर ६ गुंठे पेक्षा जास्त मालकी नव्हती. मी दाव्यातील महसूल उतारे पाहिलेले आहेत. सन १९५७ च्या फाळणी नकाशामध्ये तुका चांगो मांग याच्या नावे ३ हेक्टर १० आर इतके क्षेत्र असल्याचे मला दिसून आले. त्याच्या नावे जास्त क्षेत्र कसे आले याबाबत मला माहिती नाही. त्याच्या नावे तेवढे क्षेत्र होते त्यामुळे जास्त क्षेत्र म्हणण्याचा प्रश्न नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग याच्या नावे ३ हेक्टर १० आर इतके क्षेत्र असल्याचे खोटे सांगत आहे.

५. फाळणीच्या पूर्वी तुका चांगो मांग याच्या नावे किती क्षेत्र होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ मध्ये वादी, वारणा फुड प्रॉडक्टस व आमच्या मध्ये दावा मिळकतीच्या अनुषंगाने एकत्रीकरण कार्यालय कोल्हापूर येथे वाद चालू होता. त्याच्या निकालाविरूध्द पुणे येथे व त्यानंतर मंत्रालय मुंबई येथे अपील झाले. हे म्हणणे खरे नाही की, वारणा फुड प्रॉडक्टला दावा मिळकतीच्या क्षेत्रातील

चुका बाबत माहिती होती. मी वारणा फुड प्रॉडक्ट यांच्या कडे चौकशी केली नाही कारण तसा वाद नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग याला ६ एकर ६ गुंठे क्षेत्रापेक्षा जास्त मालकी येत नसल्याने तो ते जास्तीचे क्षेत्र वारणा फुड प्रॉडक्टला विकू शकत नव्हता व वारणा फुड प्रॉडक्टला ते क्षेत्र मला विकता येत नव्हते व त्यामुळे जास्तीच्या क्षेत्राचा मी मालक होत नाही. सध्या वारणा फुड प्रॉडक्ट आहे किंवा कसे हे मला माहित नाही. मी वारणा दूध संघाचा उपअध्यक्ष आहे. वारणा फुड प्रॉडक्ट ही कंपनी होती.

वादीच्या वकिलांनी विनंती केल्याने उलतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरी/-

पेठ-वडगांव
दिनांक. २०/११/२०२५.

(**श्रीनिवास अ. कुलकर्णी**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेठवडगांव.